**नोंदणी व मुद्रांक विभागातील सह दुय्यम निबंधक वर्ग-२/सह जिल्हा निबंधक वर्ग-२ या संवर्गातील अधिकाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार तीन लाभांच्या सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ मंजूर करणेबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन आदेश क्रमांक : आस्थाप-२०२२/१९२०/प्र.क्र.४२०/म-१(धोरण)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार इमारत), मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १४ जानेवारी, २०२५.

**संदर्भ:** १) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,महाराष्ट्र राज्य,राज्य,पुणे यांचे पत्र क्र.का.९/आस्था-४/वर्ग-२ आश्वासित/६७६/२०२१, दि.३०.०३.२०२१
२) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक:-वेतन-१९९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३, दि.२०.०७.२००१
३) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.असंक-१००१/प्र.क्र.२९(भाग-४)/२००४/वित्तीय सुधारणा-१,दि.२६.३.२००४
४) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेतन-११९९/प्र.क्र.०३/२०१९/सेवा-३,दि.०२.०३.२०१९
५) श्री.रमेश पगार, सह जिल्हा निबंधक वर्ग-१,बुलढाणा यांचे पत्र दि.१०.१०.२०२२
६) महसूल व वन विभाग, शासन आदेश क्र. आस्थाप-२०२२/१९२०/प्र.क्र.४२०/म-१(धोरण), दि.२७.२.२०२३
७) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र क्र.का.९/आस्था/श्री.पगार/२०२३/३५३९/२३ दि.१.१२.२०२३
८) विभागीय पदोन्नती समितीची बैठक दिनांक १४.१०.२०२४.

**प्रस्तावना:** -

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून संदर्भ क्र.७ अन्वये प्राप्त नोंदणी व मुद्रांक विभागातील श्री.रमेश वामनराव पगार, यांना सह दुय्यम निबंधक वर्ग-२ या संवर्गात १० वर्षाचा कालावधी पूर्ण झालेला असल्याने सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन आदेश :-**

वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २ मार्च, २०१९ अन्वये सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार शासकीय कर्मचारी/अधिकाऱ्यांना १०, २० व ३० वर्षाच्या नियमित सेवेनंतर तीन लाभांची “ सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ” दिनांक ०१.०१.२०१६ पासून लागू करण्यात आली आहे.

सदर योजनेनुसार नोंदणी व मुद्रांक विभागातील सह दुय्यम निबंधक वर्ग-२/सह जिल्हा निबंधक वर्ग-२ संवर्गातील अधिकाऱ्यांना (गट-ब वेतन श्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे ४४००) या पदावर सलग १० वर्षाची नियमित सेवा पूर्ण झालेल्या खालील तक्त्यात नमूद अधिकाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ (वेतनश्रेणी-९३००-३४८००, ग्रेड पे ५०००) मंजूर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव | पदनाम व वेतनश्रेणी | सेवेत रुजू झाल्याचा दिनांक | पहिली पदोन्नती पदनाम दिनांक व वेतन संरचना | दुसरी पदोन्नती पदनाम दिनांक व वेतनसंरचना | आ.प्र.यो.च्या पहिल्या लाभाचा पात्रता दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | श्री.रमेश वामनराव पगार | दु.नि.श्रे.-२ १४००-४०-१८०० | दिनांक ०५.०४.१९९४ | दु.नि.श्रे.-१ ०१.१२.२००३ (५५००-१७५-९०००) | स.दु.नि.वर्ग-२ ४.६.२०१२ (एस-१५ ९३००-३४८००, ग्रेड पे ४४०० (२१.५.२००७ मानीव दिनांक) | २१.०५.२०१७ |

सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या लाभामुळे संबंधित अधिका-यांच्या जबाबदारीत आणि कर्तव्यामध्ये वाढ होत नसली तरी त्यांना वित्त विभाग, शासन निर्णय दि. ०२.०३.२०१९ मधील तरतुदीच्या अधीन राहून नियमित पदोन्नतीप्रमाणे पदोन्नतीच्या पदाच्या वेतन संरचनेत वेतन निश्चितीचा लाभ मिळेल. या योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतन संरचना दिल्यानंतर वेतननिश्चिती नियमित पदोन्नतीप्रमाणे होईल. मात्र, त्याच वेतनसंरचनेत नियमित कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यानंतर पुन्हा वेतननिश्चितीचा लाभ देय होणार नाही.

**२.** प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा नियमित पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या अधिकाऱ्यांना या योजनेचा लाभ देय होणार नाही. या योजनेतंर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी दिल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या वा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना देण्यात आलेला लाभ काढून घेण्यात येईल. मात्र, दिलेल्या लाभाची वसूली करण्यात येणार नाही.

**३.** या आदेशान्वये कालबध्द पदोन्नती / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनी शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक- पीएवाय-१०८२/सीआर-११००/- (एक)/एसईआर-३, दि. ०६/११/१९८४ व वित्त विभाग, शासन परिपत्रक वेपूर -२०१९/प्र.क्र.८/सेवा-९, दि. २०/०२/२०१९ नुसार वेतन निश्चितीचा विकल्प द्यावयाचा असल्यास तो त्यांनी हे आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत देण्यात यावा.

**४.** नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वरील अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीच्या पदाच्या वेतन संरचनेतील वेतन निश्चिती त्यांनी दिलेल्या विकल्पानुसार करुन त्यांना या योजनेचा लाभ त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांक व वेतनसंरचेनुसार देण्यात यावा.

सदर शासन आदेश या विभागाची नस्ती क्रमांक आस्थाप-२०२२/१९२०/प्र.क्र.४२०/म-१(धोरण) वर वित्त विभागाने अनौ./संदर्भ क्रमांक ३६३/२२/सेवा-३, दि.२३/०८/२०२२ अन्वये दिलेल्या अभिप्रायाच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२५०११४१७३३१७३८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ

Digitally signed by SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=1085617af371f507cb8ee4d914eb645d92480247b61bd58b5c3074ba3a6a62d7, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=F7145AF5949FB706E2DCB06C2B209B58FFA369F6E085E02041722C90F0528791, cn=SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ
Date: 2025.01.15 12:18:11 +05'30'

**(सत्यनारायण बजाज)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई-३२.
२. मा.उपमुख्यमंत्री महोदयांचे, खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

३. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२.
४. मा. राज्यमंत्री (महसूल), महोदयांचे खाजगी, सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३. महालेखापाल, १/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर
४. महालेखापाल, १/२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर
५. श्री.रमेश वामनराव पगार,सह जिल्हा निबंधक वर्ग-१, मुंबई उपनगर
(नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत).
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/नागपूर.
७. निवडनस्ती म-१(धोरण), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ .